माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २८०/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. जयेश पानाचंद मेहता**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एल विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यकारी अभियंता एल विभाग यांचे कार्यालय,
पहिला मजला, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत, स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प ) मुंबई -४०० ०७०.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यकारी अभियंता एल विभाग यांचे कार्यालय,
पहिला मजला, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत, स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प ) मुंबई -४०० ०७०

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २२.०१.२०२६</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु. मा. आ. नों. क्र. २७०९/२०१८ रा. मा. आ. अपील क्र. १०७६/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. १५.११.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

"ज्या अर्थी या प्रकरणामध्ये कलम ११ प्रमाणे कारवाई पूर्ण झालेली नाही. हे प्रकरण पुन्हा जन माहिती अधिकारी यांच्याकर्ड वर्ग करण्यात येत आहे. त्यांनी वरील विवेचनानुसार एक महिन्याच्या आत कारवाई पूर्ण करावी. या आदेशासह अपील निकाली काढण्यात येत आहे."

२. उक्त तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एल विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक अभियंता एल विभाग, कुर्ला (प), मुंबई-४०० ०७० यांच्याकडून दि. २७.०१.२०२१ रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला होता. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एल विभाग यांचा अहवाल आयोगास अप्राप्त आहे.

३. सुनावणीच्या वेळी तक्रारकता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकार अनुपस्थित आहेत. कोणतेही आदेश पारित करताना तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढील सुनावणीस तक्रारकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०५.०३.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ०२.०२.२०२६**

(डॉ. प्रदीप व्यास)
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**रामाआ-तक्रार क्र.बीएम - २८०/२०२०**

**तक्रारकर्ता - श्री. जयेश पानाचंद मेहता**

**सुनावणी दिनांक : ०५.०३.२०२६ (In continuation of order dt ०२.०२.२०२६)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (सुनावणी नोटीस आयोगास परत आली) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. कोणतेही आदेश पारित करताना तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढील सुनावणीस तक्रारकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित असून त्यांची सुनावणी नोटीस आयोगास परत आलेली आहे. त्यांना दूरध्वनीद्वारे संपर्क केला असता फोन लागला नाही. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केले की, सदर प्रकरणी वस्तुस्थिती सादर करण्याकरिता आणखी वेळेची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०७.०४.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप 6-3-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०६.०३.२०२६**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २८०/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. जयेश पानाचंद मेहता**

**सुनावणी दिनांक : ०७.०४.२०२६ (In continuation of order dt ०६.०३.२०२६)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, सदर प्रकरणी वस्तुस्थिती सादर करण्याकरिता आणखी वेळेची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे असे आयोगाने आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणी वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केले की, मागील सुनावणी नंतर दि. १३.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये तक्रारकर्ता यांना हवी असलेली माहिती पुन्हा पाठविण्यात आली होती. परंतु सदर पत्र टपालाने परत कार्यालयास प्राप्त झाले आहे. तक्रारकर्ता यांचे पत्त्यावर प्रतिनिधी पाठविले असता असे समजले की, तक्रारकर्ता मयत झालेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. १३.०३.२०२६ ची प्रत तसेच तक्रारकर्ता यांचे मृत्यु प्रमाणपत्राची प्रत आयोगास सादर केली.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०८.०४.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**